ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, वर्धा

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्रमांक . ०७१५२-२५२२८८ ई-मेल- eebnwardha@gmail.co

क्रमांक जिपव/ग्रापापुवि/आस्था-१/वशि-1888/२०२२ दिनांक :- 29/7/२०२२

**सेवानिवृत्त शासकिय / निमशासकीय अधिका-यामधुन सेवा करार पध्दतीने घेणेबाबत जाहिरात प्रारुप**

सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संकर्णी : २७१५/प्र.क्र.-१००/१३/दिनांक १७ डिसेबर -२०१६ तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील पत्र क्र.रापास्वमि-११२१/प्र.क्र.१०८/पापु-२५ दिनांक ०९ नोव्हेंबर अन्वये सेवा निवृत्त सेवानिवृत्त तांत्रिक तज्ञ अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने जलजीवन मिशन अंतर्गत ११ महिने करीता घ्यावयाचे आहेत.जिल्हा परिषद,वर्धा अंतर्गत जलजीवन मिशन व अनुषंगीक कामे (Empanelment) करण्यासाठी पात्र सेवानिवृत्त तांत्रिक तज्ञ अधिका-यांकडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

२ करार पध्दतीने नियुक्ती करावयाचे सेवानिवृत्त अधिका-यांची खालील तक्त्यात नमुद पदे त्यांच्या नांवासमोर नमुद संवर्गातुन सेवानिवृत्ती शासकीय/निमशासकीय अधिका-यामधुन करार पध्दतीने भरावयाची आहेत.

| अ.क्र. | विभागाचे नांव | पदनाम | एकुण पदे |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद,वर्धा | तांत्रिक तज्ञ | १ |
| २ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद,वर्धा | तांत्रिक समन्वयक | २ |

३. उपरोक्त पदांसाठी अर्जाचा नमुना,अर्हता,अनुभव,वयोमर्यादा,मासिक देय पारिश्रमिक,कामाचे स्वरुप तसेच ईतर अटी व शर्ती निवडप्रकीया याबाबत सविस्तर तपशिल https://www.zpwardha.in या संकेतस्थाळवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

४. इच्छुक सेवानिवृत्त पात्र अधिका-यांनी उक्त संकेतस्थळावरील जाहिरातीचा व सुचनांचा बारकाईने अभ्यास करुन आपला विहीत नमुन्यातील अर्ज कागदपत्रासह दिनांक 22/8/22 पर्यंत रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वरील कार्यालयाच्या पत्यावर पोष्टाने किंवा प्रत्यक्ष सादर करावा. विहीत वेळेनंतर आलेले अर्ज स्वीकरण्यात येणार नाहीत. अपुर्ण स्वरुपातील अर्ज व अटीची पुर्तता न करणारे अर्ज करार पध्दतीने नियुक्तसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. यापुर्वी अर्ज केले असल्यास नव्याने अर्ज करावेत.

(दिपक शा.वाघ)
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद,वर्धा

(डॉ.सचिन ओमबासे,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,वर्धा

Rojgarmarathi.com

# तांत्रिक प्रशिक्षित यंत्रणेतील सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पध्दतीने कामावर नेमणुकीबाबत अटी व शर्ती.

- सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासननिर्ण क्रमांक संकीर्ण : २७१५/प्र.क्र.-१००/१३/दिनांक १७ डिसेबर -२०१६ तसेच पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचेकडील पत्र क्र.रापास्वामि-११२१/प्र.क्र.१०८/पापु-२५/दिनांक ०९ नोव्हेंबर अन्वये तांत्रिक तज्ञ व तांत्रिक समन्वयक पदाकरीता सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा करार पध्दतीने जलजीवन मिशन अंतर्गत ११ महिण्या करीता घ्यावयाचे आहेत.जिल्हा परिषद,वर्धा अंतर्गत जलजीवन मिशन व अनुषंगीक कामे (Empanelment) करण्यासाठी पात्र सेवानिवृत्त तांत्रिक तंज्ञ अधिका-यांकडुन विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

- **विवक्षित कामाचे स्वरुप**

  अ) Project Managemant Consultancy व्दारे DPR चे संनियंत्रण करणे.
  
  ब) त्रयस्थ पहाणी यंत्रणेच्या (TPLA) कामांचे संनियंत्रण व मुल्यमापन करणे.
  
  क) IMIS वरिल Data updation व Data आवश्यक ती कार्यवाही करणे.

- **कामाचा कालावधी**

  सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय संकीण: २७१५/प्र.क्र-१००/१३ दिनांक १७ डिसेंबर-२०१६ अन्वये सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्तीचा कालावधी ११ महिने पर्यत राहील.

- **देय मासिक व परिश्रमीक व भत्ते**

  सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक संर्कीर्ण : २७१५/प्र.क्र-१००/१३ दिनांक १७ डिसेंबर-२०१६ ड मधील १ अन्वये राहील.

- **नामीकासुचीची वैधता**

  प्राप्त अर्जातुन पात्र उमेदवारांची निवड करुन नामिकासुची (Panel) नियुकतीसाठी सक्षम प्राधिकारी तयार करतील, सदर नामिका सुचीतील व्यक्तीमधुन करार पध्दतीने नियुक्ती करण्यात येईल.सदर नामिका सुचीची वेधता जास्तीत जास्त ३ वर्ष राहील,तसेच त्या सुचीचा आढावा घेण्यात येईल.

- **बंधपत्र/हमीपत्र.**

  नियुतीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षीत कामे पुर्ण करण्याची जबाबदारी संबधित व्यक्तीची राहील. आशयाचे बंधपत्र/हमीपत्र संबधित अधिका-याना सादर करावे लागेल. तसेच बंधपत्रात हमीपत्रात करार पध्दतीने नियुक्ती देतांना शासनाने सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक संर्कीर्ण २७१५/प्र.क्र-१००/१३ दिनांक १७ डिसेंबर-२०१६ अन्वये विहीत केलेल्या अटी व शर्ती तसेच विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडुन नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही. याचा उल्लेख असलेल्या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र सादर करावे लागेल.

- **निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा**

  ज्या सेवानिवृत्त अधिका-यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार त्यांना करार पध्दतीने नियुक्त करताना, सेवानिवृत्तपुर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्याची रककम केवळ हिशेबासाठी परिगणित करुन त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात यावे.

- **भते-** उक्त तरतुदीनुसार निश्चित होणा-या मासिक पारिश्रमिककाच्या जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम निवास भत्ता,प्रवास भत्ता आणि दुरध्वनी भत्ता या सर्व भत्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल.सदर रक्कम नियुक्ती करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता,कार्यकुशलता,त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ.बाबी विचारात घेउन निश्चिती करण्यात यावी.

- **प्रवासभत्ता व दैनिक भता** करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

Rojgarmarathi.com

- **वयोमर्यादा.**

करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ वर्षापर्यंतच कार्यरत राहु शकतील.म्हणजेच कमाल ६४ वर्ष वय असलेले सेवानिवृत्त अधिकारी अर्ज करण्यास पात्र राहील.

- **अर्हता व अनुभव**

१) विवक्षीत कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा शासकीय कामाचा किमान तिन वर्षाचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात यावी.

२) करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) करार पध्दतीने नियुक्ती करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावीत नसावी,किवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

- **इतर अटी व शर्ती**

१. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशन/समावुन घेण्याचे वा नियमित सेवेचे ईतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/हक्क नसेल.

२. नियुक्ती साठी समक्ष प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पध्दतीवरिल सेवा समाप्त करु शकतील.

३. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेली व्यक्ती,सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल,अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

४. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

५. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधर सामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

६. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेली कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पुर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मुल्यामापन करतील.

७. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करण्यात येणार नाहीत.

कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग
जिल्हा परिषद,वर्धा

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,वर्धा

Rojgarmarathi.com

# अर्जाचा नमुना

## करार पध्दतीने सहाय्यक भुवैज्ञानिक पदासाठी करावयाचा अर्ज

| कार्यालयीन उपयोगासाठी<br>अर्ज क्रमांक -<br><br>अर्ज प्राप्त दिनांक - |
|---|

| पासपोर्ट साईज फोटो |
|---|

१) उमेदवाराचे संपुर्ण नांव ---------------------------------
२) वडीलांचे / पतीचे नांव ----------------------------------
३) जन्मतारीख ---------------------------------
४) सेवानिवृत्तीची तारीख व कार्यालय ---------------------------------
५) वय (१/१/२०२१ रोजीचे) ---------------------------------
६) कायमचा पत्ता ---------------------------------
७) पत्र व्यवहाराचा पत्ता ---------------------------------
८) संपर्क क्रमांक ----------------------------------

मोबाईल क्रमांक /दुरध्वनी क्रमांक /ई-मेल आयडी

९) लिंग ( पुरुष/स्त्री )
१०) अनुभव

| अ.क्र. | काम केलेली संस्था/कार्यालयाचा पत्ता | पदाचे नांव | कामाचा कालावधी | | वेतन रुपये |
|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | |
| | | | | | |
| | | | | | |

११) सेवानिवृत्ती होण्यापुर्वी धारण केलेल्या पदाचे व कामाचे स्वरुप
१२) शेवटच्या वेतनाचा तपशिल-वेतन बॅड मधील वेतन---------- + ग्रेड वेतन-------------
१३) मंजुर केलेले सेवानिवृत्तीवेतन (P.P.O. प्रत जोडवी) ----------------------------------
१४) ज्या जिल्हयात इच्छूक आहे.त्या जिल्हाचे नाव १) ---------- २)-----------३)--------
(प्राधान्य क्रमांने तीन जिल्हयांची नांवे)

## प्रतिज्ञापत्र

मी, असे प्रमाणित करतो/करते की,आपले कार्यालयातील सेवानिवृत्त अधिकारी कंत्राटी भुवैज्ञानिक (गट ब) या संवर्गातील या पदाची जाहिरात काळजीपुर्वक वाचली सदर जाहिरातीतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत तसेच अर्जामध्ये दिलेल्या माहिती खरी असुन जर वर दिलेली माहिती खोटी असल्यासचे आढळुन आल्यास माझ्या यापदासाठी उमेदवारी रदद होईल याबदल निवड समिती/नियुक्ती अधिकारी यांचा निर्णय मला बंधनकारक राहील

आपला/आपली विवासु

अर्जदारची सही

नांव -----------------------------

ठिकाण :
दिनांक :